## आरजीटीएसचा अंतिम फायदा सामान्य बँक ग्राहकांना मिळवून द्याः रिझर्व बँकेचे बँकांना आवाहन

## जुलै २१, २००३

भारतीय रिझर्व बँकेचे डेप्युटी गव्हर्नर श्री.वेपा कामेसन यांनी आज बँकांना आवाहन केले, की बँकानी पायाभूत सुविधा व मानव संसाधन या बाबतीत पूर्ण तयारी ठेवावी, आणि कनेक्टिव्हिटी व सुरक्षितता ठेवावी, जेणेकरुन रिअल टाईम ग्रॅास सेटलमेंट (आरजीटीएस) च्या सुविधा सामान्य ग्राहकांपर्यंत पोहोचू शकतील. त्यांनी पुढे म्हटले की प्रत्येक मध्यवर्ती बँकेसाठी एक अतिमहत्वाचे उद्दिष्ट असते, ते म्हणजे प्रदान व पूर्तता यांची एक अत्यंत आधुनिक, सशक्त सुरक्षित व एकत्रिकृत व्यवस्था कार्यान्वित ठेवावी, जेणेकरुन सामान्य माणूस कोणत्याही अत्यंत कार्यक्षम पद्धतीने व कमी खर्चामध्ये प्रदाने पाठवू शकेल. श्री कामेसन हे आज भारतीय रिझर्व बँके मध्ये भरलेल्या बँकांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये भाषण करत होते. ही बैठक बँकांच्या आरजीटीएस च्या अंमल बजावणी संदर्भातील तयारीची माहिती घेण्यासाठी बोलाविण्यात आली होती.

आरजीटीएस प्रणाली, ऑक्टोबर २००३ महिना अखेरीस हाती येणे अपेक्षित आहे, व त्यानंतर वर्षा अखेराच्या आत ती बसवून, चाचण्या घेणे व समांतर चालन (पॅरलल रन) ची सुरुवात होणार आहे. आरजीटीएस प्रणालीमुळे प्रत्येक व्यवहाराच्या आधारे मोठ्या रकमांची बँक प्रदाने व पूर्तता 'रिअल टाईम' मध्ये ऑन-लाईन करण्याची सुविधा होणार आहे. तिच्यामुळे सिस्टिमिक कार्यक्षमता वाढेल व सध्याचे पूर्तते मधील धोके किमान पातळीवर येतील.

आरजीटीएस कार्यान्वित करण्यासाठी काही गोष्टींची आवश्यकता आहे. त्यांमध्ये, संपूर्ण उद्योगामध्ये संपर्कयंत्रणेचे जाळे, आरजीटीएस सहित सिस्टिमिक महत्वाच्या पेमेंट सिस्टिम ऍप्लिकेशन्स कार्यान्वित करण्यासाठी विश्वासार्ह, लवचिक व अत्याधुनिक संगणक व्यवस्था, इलेक्टॉनिक आधारित प्रदाने व पूर्ततांसाठी सुविधा, आंतरबँका व बँकेमधील उपयोगांसाठी संदेश आकृतिबंधांचे समानीकरण, आंतरराष्ट्रीय स्तरावरील सुरक्षा असलेली संदेश यंत्रणा, आरजीटीएस मधील प्रत्येक सहभाग्याने योग्य व्यवसाय प्रक्रियेचे पुर्नघटन करणे, आणि प्रगत रोखता-व्यवस्थापनाच्या सोयी अंतर्भूत आहेत. या पैकी बहुतांश आवश्यकता आधीच पूर्ण झाल्याचे सांगण्यात आले.

या संदर्भात बँक संचालकांनी दुसऱ्या लिक्विडिटी ऍडजस्टमेंट फॅसिलिटी पर्यायाच्या, ज्यामध्ये दिवसामध्ये एसएलआर सिक्युरिटीज चा कोलेटरल म्हणून वापर करण्याचा आहे, आवश्यकतेवर चर्चा केली, पूर्वसूचना न देता ग्राहकांच्या खात्यांमधून मोठ्या क्रेडिट रकमांचे हस्तांतरण करण्याची शक्यता व त्यामुळे बँकानी अधिक चांगले रोख व्यवस्थापन करण्याची गरज, यांवर चर्चा केली. या संदर्भात, डेप्युटी गव्हर्नरांनी असेही लक्षात आणून दिले, की आरजीटीएस प्रणाली कार्यान्वित केल्यामुळे बँकांना आणखी नवी उत्पादने देता येतील, जी दिवसामधील रोखता व्यवस्थापनामधून निष्पन्न होतील. त्यांनी आणखी एक शक्यता सांगितली, की ग्राहकाला फी वर आधारित आरजीटीएस सेवा देता येईल, ज्यामुळे बँकांना उत्पन्नाचे आणखी एक साधन मिळेल, त्याच बरोबर त्यांनी बँकांना पूर्वसूचना दिली, की आरजीटीएस कार्यान्वित केल्यामुळे त्यांना उपलब्ध असलेल्या फ्लोट फंड्स वर परिणाम होईल व त्यांना त्यांच्या उत्पादनाच्या मूल्य-आकृतीबंधाचा पुनर्विचार करावा लागू शकेल.

आरजीटीएसच्या प्रगतीचा आढावा घेताना, डेप्युटी गव्हर्नरांनी लक्षात आणून दिले, की रिझर्व बँकेने सेंट्रलाईज्ड फंड मॅनेजमेंट सिस्टिम (सीएफएमएस) सुरु केली आहे, जी बँकाना आरबीआयच्या १५ केंद्रावरील त्यांच्या फंडस पोझिशन बद्दल ऑन-लाईन माहिती पुरविते.

त्याखेरीज सप्टेंबर २००३ पर्यंत रिझर्व बँक सेंट्रलाईज्ड फंड मॅनेजमेंट सिस्टिम अंतर्गत, बँका व रिझर्व बँक कार्यालयां दरम्यान निधी हस्तांतरण सुविधा उपलब्ध करुन देईल. स्ट्रक्चर्ड फायनान्शिअल मेसेजिंग सिस्टिम (एसएफएमएस) ही, स्विफ्ट या आंतरराष्ट्रीय निधी हस्तांतरणासाठीच्या, आणि पुरेशी सुरक्षितता असेलेल्या यंत्रणेबरहुकूम कार्यान्वित करण्यात आली आहे.

**अजित प्रसाद**
व्यवस्थापक

**प्रेस रिलीज : २००३-२००४/९६**